




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २१.०८.२०२५ | अंक नं. १२१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







# थकबाकीदार गाळेधारकांवर जप्तीची कारवाई सुरू

**रंगभवन व्यापारी संकुलातील २० गाळेधारकांनी कारवाई टाळण्यासाठी भरले ४८.९६ लाख; धनादेश न वटल्यास तत्काळ गाळा जप्त करून खटला दाखल करणार : आयुक्त**

नगर - महानगरपालिकेच्या मालकीच्या गाळ्यांच्या थकबाकी वसुलीसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जप्ती मोहीम सुरू केली आहे. मार्केट विभागाच्या पथकाने २१ ऑगस्ट रोजी सहाय्यक आयुक्त सपना वसावा यांच्या नेतृत्वाखाली सर्जेपुरा येथील रंगभवन व्यापारी संकुलातील थकबाकीदार गाळेधारकांवर जप्ती कारवाईचा बडगा उगारतच २० गाळेधारकांनी थकीत रकमेचा धनादेश जमा केला आहे.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार शहरातील महानगरपालिकेच्या गाळे, खोल्या, कार्यालये आदींकडे असलेल्या भाड्याच्या थकीत वसुलीसाठी मोहीम सुरू करण्यात आली आहे. थकबाकीदार गाळेधारकांना यापूर्वीच जप्ती कारवाईच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. नोटीसीची मुदत संपल्यानंतर आता मार्केट विभागाकडून जप्ती कारवाई व वसुली मोहीम सुरू करण्यात आली आहे. गुरुवारी सहाय्यक आयुक्त सपना वसावा व मार्केट विभाग प्रमुख सतीश पुंड, वसुली लिपिक करण डापसे, संकेत कोतकर, राहुल झिंजे, शिवराम गवांदे, आसाराम गुंड, तुळशीराम जगधने, शिवाजी गाढवे यांच्या पथकाने सर्जेपुरा रंगभवन व्यापारी संकुलातील ३९ थकबाकीदारांपैकी २० गाळेधारकांवर कारवाईचा बडगा उगारला. या २० गाळेधारकांनी कारवाई टाळण्यासाठी ४८.९६ लाख रुपयांची थकबाकी धनादेशाद्वारे जमा केली आहे.



थकबाकीदार गाळेधारकांकडून धनादेश स्वीकारताना मनपाचे अधिकारी.

महानगरपालिकेने सर्वच थकबाकीदार गाळेधारकांवर कारवाई सुरू केली आहे. सुमारे २५ कोटींची थकबाकी आहे. नोटीसा बजावूनही थकबाकी भरत नसतील तर आता कठोर कारवाई करण्याशिवाय महानगरपालिकेकडे पर्याय नाही. सर्व थकबाकीदारांना अनेकवेळा आवाहन करूनही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे जप्ती कारवाई सुरू करण्यात आली आहे. कारवाई टाळण्यासाठी तत्काळ थकीत भाडे जमा करावे, असे आवाहन करतानाच वसुलीवेळी दिलेले धनादेश न वटल्यास तत्काळ गाळा ताब्यात घेऊन फौजदारी खटला दाखल केला जाईल, असा इशाराही आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.




# नगर शहरात ठिकठिकाणी रस्त्यावर साचलेत कचऱ्याचे ढीग
# महापालिकेच्या नियोजनशून्य कारभारामुळे पुरता बोजवारा

नगर - महापालिका प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे शहरातील नागरिकांना सध्या विविध प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. सध्या कचरा संकलनाचे तीन तेरा वाजले असून सर्वत्र रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग दिसत आहेत. घरोघरी घंटागाडी येत नसल्यामुळे नागरिकांच्या घरी कचरा साठवून ठेवला जातो. त्याची दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नदेखील निर्माण झाला आहे.



(छाया - धनेश कटारिया)

शहरात ठिकठिकाणी रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे मोठ मोठे ढीग साचलेले दिसून येत असून महापालिकेने कचरा संकलनाचा ठेका दिलेल्या संस्थेकडून ३-४ दिवस हा कचरा उचलला जात नसल्याचे दिसून येत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या कचऱ्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

नगर शहरात नागरिकांनी रस्त्यावर टाकलेला कचरा उचलला जात नाही, यामुळे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढिगारे साचत आहेत. हे ढिगारे पाहून शहरातील स्वच्छतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. नगरकर गेल्या अनेक वर्षापासून पाणी, स्वच्छता, लाईट, रस्ते या सुविधा चांगल्या मिळण्यासाठीच अजून लढा देत आहेत, असे अजून किती वर्ष चालणार आणि लोकांना कर भरून सुद्धा या समस्यांमधून सुटका कधी मिळणार, की कायम या समस्या अशाच राहणार आहेत.

### पावसामुळे कचरा सडून पसरली दुर्गंधी

शहरात महापालिकेकडून गेल्या ३-४ दिवसांत कचरा उचलला गेला नसल्याने सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचलेले असून सध्या होत असलेल्या पावसामुळे हा कचरा सडल्याने दुर्गंधी सुटली आहे. त्याचा शहरातील नागरिकांना, व्यापाऱ्यांना नाहक त्रास सहन करण्याची वेळ आली आहे. घाणीच्या साम्राज्यामुळे डेंग्यू, मलेरिया, निमोनिया यासारख्या आजारांची साथ पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. लवकरच गणेशोत्सव सुरु होणार आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची मंडप टाकण्यासाठी लगबग सुरु आहे. अनेक ठिकाणी तर या मंडपाच्या जागीच कचऱ्याचे ढीग असल्याने या मंडळाच्या कार्यकर्त्यांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### मोकाट कुत्र्यांचा उपद्रवही वाढला

शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा सर्रासपणे वावर सुरू असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. महापालिकेकडून कुठल्याही उपाययोजना होताना दिसत नाहीत. शहरात रस्त्याच्या कडेला साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांवर मोकाट कुत्र्यांच्या टोळ्या पाहावयास मिळत आहे. ही हिंसक कुत्री हल्ला करत असल्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. या मोकाट कुत्र्यांचा महापालिकेने बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

### लोकप्रतिनिधींचे आंदोलनाचे इशारे पण महापालिका प्रशासन ढिम्मच

गेल्या काही दिवसांपासून कचरा संकलनाचा बोजवारा उडाल्याने अनेक माजी नगरसेवकांनी स्वखर्चातून कचरा उचलण्याची व्यवस्था केली होती. तसेच अनेकांनी या संदर्भात आंदोलनाचे इशारेही दिले होते. तरीही महापालिका प्रशासनावर त्याचा काहीही परिणाम झाल्याचे दिसत नाही. लोकप्रतिनिधींवर जर स्वखर्चातून कचरा उचलण्याची वेळ येत असेल तर महापालिका प्रशासनाची ही व्यवस्था नेमकी कशासाठी आहे? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. महापालिकेच्या कारभाराच्या विरोधात नागरिकांमध्ये मोठी संतापाची लाट आहे.






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com



शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी आदींसह विविध मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

# शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी

## निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्या आदी मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकारी कार्यालयावर लक्षवेधी आंदोलन

नगर – शेतकरी कर्जमाफी, उस, कांदा, कापूस व दुध दर, मराठा व इतर आरक्षण, निवडणूका बॅलेट पेपरवर घेणे आणि अतिवृष्टी झाल्याने ओला दुष्काळ जाहीर करत शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ हेक्टरी ५० हजार नुकसान भरपाई तात्काळ जाहीर करून द्यावी आदिसह विविध मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीदरम्यान आपण शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन जनतेला दिले होते. ऊस, कांदा व इतर शेतमाल तसेच दुधाच्या दरात वाढ व मराठा, धनगर व इतर जात समूहाचे आरक्षण आदी प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे जनतेला आश्वाशित केले होते. आपण सत्तेवर आलात व मुख्यमंत्री झालात मात्र या गंभीर विषयांबाबत आपण चालढकल करत आहात, असा आरोप राजेश परकाळे यांनी निवेदनाद्वारे केला आहे.

निवेदनात पुढे म्हटले की, आज महाराष्ट्रातील संपूर्ण शेतकरी अत्यंत कठिण परस्थितीत असून, कर्जबाजारी झाला आहे. महाराष्ट्रात दर दिवशी सरासरी तीन शेतकरी कर्जाच्या विळख्याने आत्महत्या करीत आहेत. आपण निवडणुकीत कर्जमाफीबाबत आश्वाशित केल्याने तो मोठ्या अपेक्षेने याबाबत आपणाकडे आस लावून बसला आहे. सरकारने तातडीने सरसकट शेतकरी कर्जमाफी करून बळीराजाला सुखी करावे. महाराष्ट्रात मराठा, धनगर व इतर काही जात समूह आरक्षणाची मागणी करत असून, याबाबत समाजबांधव आक्रमक असून त्यांच्या भावनाही तीव्र आहेत. सरकारमधील काही आपले प्रतिनिधी व जबाबदार मंत्री या संवेदनशील विषयावर विक्षिप्त विधाने करून वातावरण बिघडवत आहेत. जातीय तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न करत आहेत. राज्याचे प्रमुख म्हणून आपण जबाबदारीने हा विषय निकाली काढावा. मराठा समाजाला आरक्षणाचा संवैधानिक हक्क प्रदान करावा. मराठा, ओबीसी व इतर असा जातीय संघर्ष व तेढ निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी.

महाराष्ट्रातील शेतकरी मुख्यतः उस, कापूस, कांदा, सोयाबीन, धान व दुध व्यवसाय यावर मोठ्या प्रमाणात गुजरान करत आहे मात्र याबाबत सरकार म्हणून आपण उदासीन आहात. उसाला सहकारी अथवा खाजगी कारखानदार एफआरपी प्रमाणे दर देत नाही, तत्काळ पेमेंट देत नाहीत. तसेच कारखान्यावरील वजन काटे सदोष आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. कारखानदार कोट्यवधीची चोरी करत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फसवत आहेत. महाराष्ट्रात कडक कायदा करून उसाला एफआरपी प्रमाणे दर देऊन ७ दिवसांत पेमेंट देण्याचे आदेशित करावे. प्रत्येक कारखान्याचा वजन काटा पारदर्शक असावा याबाबत कायदा करावा.

दुधाला दूध उत्पादनाच्या खर्चावर आधारीत दर दिला जात नसून यामागे फार मोठे षडयंत्र असून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात भेसळीच दूध अल्पदरात तयार करून विकले जाते व प्रत्यक्षात दूधउत्पादकांना कमी दर देऊन दूध उत्पादन वाढणार नाही याची काळजी या षडयंत्राद्वारे भेसळखोर घेत आहेत. यासाठी कर्तव्यदक्ष यंत्रणेमार्फत या भेसळखोरांवर कारवाई करावी. दुध भेसळीबाबत कठोर पावले उचलावीत. भेसळ बंद करून दुधाला ७० रुपये दर जाहीर करावा.

राज्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असल्याने राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून पंचनाम्याचे नाटकं न करता शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५०,००० रुपये प्रमाणे नुकसान भरपाई द्यावी तसेच कांदा, सोयाबीन, कापूस व इतर शेतमाला बाबत तत्काळ उत्पादन खर्चाचा विचार करून हमीभाव जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. येणाऱ्या काळात महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या पृष्ठभूमीवर या निवडणुका बॅलेट पेपर वरच घेण्यात याव्यात, निवडणूक आयोगाने व्हीव्हीपॅट लावणार नसल्याचे जाहीर केले असून, सध्या देशभर इव्हीएमबाबत संशयाचे वातावरण असल्याने बॅलेट पेपरवरच या निवडणुका घेऊन सरकारने पारदर्शक कारभार स्पष्ट करावा. या निवेदनाद्वारे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे आज महाराष्ट्रभर लक्षवेधी आंदोलन केले असून भविष्यात या विषयावर निर्णय झाला नाही तर पुढील दिशा लवकरच ठरवणार असल्याचे परकाळे यांनी सांगितले आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष राजेश्री शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष सुदाम कोरडे, जिल्हा महासचिव निलेश बोरुडे, शाम जरे, अरविंद गेरंगे, लक्ष्मण गायके, राजू काटकर, सोमनाथ गोपाळे, आदिनाथ काळे, शरद जोशी, अभी मेढे, अच्युत गाडे, विठ्ठल देठे, सचिन काकडे, महेश दानवे, संतोष कोकाटे, घनश्याम काळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई द्या : खासदार निलेश लंके



नगर –नगर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सलग आणि अतिवृष्टीसमान पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खा. निलेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

खा. लंके यांनी पत्रात नमुद केले आहे की, तूर कपाशी, सोयाबीन, मका, वाटाणा यांसह खरिपातील इतर पिके पावसामुळे पाण्याखाली गेली आहेत. काही भागांत दुष्काळसदृश परिस्थितीत पिके खुंटलेली असतानाच अचानक झालेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा पाण्यात गेल्या.

विशेषतः शेवगांव तालुक्यातील खामगांव, हिंगणगांव, गुंफा, जोहरापूर, भातकुडगांव तसेच राहुरी, नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड व पाथर्डी तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याच्या तक्रारी असल्याचे खा. लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. खा. लंके यांनी या पत्रात म्हंटले आहे की, शेतकऱ्यांनी मोठ्या खर्चाने खते व औषधे टाकून पिके उभी केली होती. मात्र, अतिवृष्टीमुळे कपाशी पिवळी पडली, सोयाबीनची फुले गळून पडली तर तूर व वाटाणा पूर्णपणे उध्वस्त झाले आहेत. यामुळे शेतकरी हवालदिल झाले असून या नुकसानीचे पंचनामे न झाल्याने शेतकरी रोष व्यक्त करत आहेत.

### तातडीने पंचनामे करा

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात खा. लंके यांनी म्हंटले आहे की, महसूल व कृषी विभागाने तातडीने नुकसानग्रस्त भागात जाऊन पंचनामे करावेत व शासनस्तरावरून शेतकऱ्यांना त्वरीत नुकसानभरपाई मिळावी. शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे, त्यामुळे तात्काळ दिलासा मिळणे गरजेचे आहे असे त्यांनी म्हंटले आहे.

# कर्जमाफीची मागणी करत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्याची आत्महत्या

## मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे व्हिडिओद्वारे मांडली होती व्यथा


बाळासाहेब सरोदे (मयत)

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातल्या नेवासा तालुक्यातील वडुले येथील एका शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली असून, आत्महत्येपूर्वी व्हिडीओ रेकॉर्ड करून राज्य सरकारला जबाबदार धरल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मृत शेतकऱ्याचे नाव बाबासाहेब सुभाष सरोदे (वय ४४) असे आहे. त्यांनी शेतातच विषारी औषध प्राशन करून जीवनयात्रा संपवली. आत्महत्येपूर्वी त्यांनी बनवलेल्या व्हिडीओमध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत.

व्हिडीओमध्ये सरोदे यांनी म्हटले आहे की, मी एक अल्पभूधारक शेतकरी आहे. कर्जमाफी होईल या आशेवर जगत होतो. दोनदा भाजप सरकार आले, देवेंद्र फडणवीस दोनदा मुख्यमंत्री झाले, पण कर्जमाफी केली नाही. आजचे सरकार अर्थव्यवस्थेच्या नावाखाली औद्योगिक विकासासाठी आहे, शेतकऱ्यांसाठी नाही. बजेटमध्ये आमच्यासाठी काहीच नाही. योग्य वेळी मदत झाली असती तर आज मी हा टोकाचा निर्णय घेतला नसता. असे सांगताना त्यांनी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या धनवंतांनी अखंड पिळले । धर्मांधांनी तसेच छळले । मगराने जणू माणिक गिळिले । चोर जाहले साव ।। अशा शब्दांत आपली व्यथा मांडली आहे.

यापुढे त्यांनी आपल्या कुटुंबासाठी मदत मिळावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली. मयत सरोदे यांच्या पश्चात आई, पत्नी अर्चना, मुलगी किरण, दोन मुले सूरज (वय १७) व रोशन (वय १४ ), तसेच भाऊ व इतर कुटुंबीय आहेत. या प्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दरम्यान, या घटनेचा निषेध म्हणून वडुले ग्रामस्थ आणि प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने २१ ऑगस्ट रोजी सकाळी वडुले येथे निषेध सभा आयोजित करण्यात आली होती. अशी माहिती प्रहारचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सांगळे यांनी दिली. या घटनेला चार दिवस झाले तरीही प्रशासनातील अधिकारी किंवा राजकीय मंडळी यांनी भेट देण्याची तसदी घेतली नाही, हे दुर्दैवी आणि मनाला वेदना देणारे आहे. अन्नदाता शेतकरी कर्जबाजारीपणामुळे जीव देतो आणि सत्ताधाऱ्यांना याची जाणीव होत नाही, हे समाजासाठी लाजिरवाणे आहे, असेही ते म्हणाले.

## अरुणा लोढा यांचे अल्प आजाराने निधन




नगर – टिळक रोड येथील अक्षता गार्डन मागे राहणाऱ्या सौ. अरुणा सुमतीलाल लोढा (वय ६७) यांचे २१ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने पुणे येथे निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## कमलाबाई सुराणा यांचे अल्प अजाराने निधन



नगर – माणिकनगर येथील एमएसईबी कॉलनीतील रहिवासी कमलाबाई रायचंद सुराणा (आर्वीवाला) (वय ९०) यांचे २० ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातु, पणतू असा परिवार आहे. ठोक कपडा व्यापारी दिलीप व अनिल सुराणा यांच्या त्या मातोश्री होत तसेच चिचोंडी पाटील येथील अशोक व विजय मुनोत यांच्या बहिण होत.

## अशोक ताठे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – मल्हार चौक येथील रहिवासी अशोक पंढरीनाथ ताठे (वय ७३) यांचे १८ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, १ भाऊ, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अमित, चेतन, निलेश यांचे ते वडील होत. आनंदी बाजार येथील एक्सपर्ट सायकल मार्टचे ते मालक होते.

## गंगुबाई आव्हाड यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – जुन्या काळातील शिक्षिका गंगुबाई रामकृष्ण आव्हाड (वय ८३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे, मुलगा, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. मूळच्या वडुले वाघोली (ता. शेवगाव) येथील असलेल्या गंगुबाईंनी ३८ वर्षे अध्ययनाचे कार्य केले होते. सध्या त्या नगरमध्ये राहत होत्या. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. दिवंगत कृषी कर्मचारी सतीश आव्हाड, आयुर्वेद महाविद्यालयातील निवृत्त कर्मचारी रमेश आव्हाड, सेवानिवृत्त शिक्षिका विजया आघाव व शिक्षिका प्रतिभा दराडे यांच्या त्या मातोश्री होत.


## वसंतराव गाडे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी वसंतराव वामनराव गाडे (मेजर) (वय ७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, पत्नी, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विजय व संजय गाडे यांचे ते वडील होत.

# अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्राचा नवीन विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरू

## राज्य शासनाने नियुक्त केलेल्या डीपी युनिटने केलेला विद्यमान जमीन वापर नकाशा नागरिकांना पाहण्यासाठी प्रसिद्ध, सुधारणा किंवा त्रुटी असल्यास संपर्क साधावा : आयुक्त



नगर – अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्राचा सुधारीत विकास आराखडा तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने नियुक्त केलेल्या नगररचना विभागाच्या पथकाने (डीपी युनिट) मूळ हद्द व वाढीव हद्दीचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केला असून हा नकाशा नागरिकांना पाहण्याकरिता महानगरपलिका व विकास योजना विशेष घटक कार्यालयात, कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच सदर नकाशा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. याबाबत महानगरपालिकेने जाहीर सूचना प्रसिद्ध केली असून, विद्यमान जमीन वापर नकाशामध्ये काही सुधारणा किंवा त्रुटी असल्याबाबत, नागरिकांनी निदर्शनास आणून दिल्यास प्रस्तावित जमीन वापर नकाशा तयार करताना योग्य ती दखल घेण्यात येईल. त्यासाठी, नागरिकांनी किंवा संबंधित व्यक्तींनी कार्यालयास कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.



अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्राचा नवीन विकास आराखडा तयार करण्याचे काम करताना आयुक्त यशवंत डांगे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्राच्या मूळ हद्दीची विकास योजना अधिसूचना ४ जुलै २००५ अन्वये मंजूर आहे. तर, वाढीव हद्दीची विकास योजना अधिसूचना ४ एप्रिल २०१२ अन्वये मंजूर आहे. या विकास योजना सुधारित करण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ कलम चे कलम २३(१) अन्वये सर्वसाधारण सभेचा ठराव करून ७ मार्च २०२४ रोजी इरादा जाहीर केलेला आहे.

राज्य शासनाने नवीन विकास आराखडा तयार करण्यासाठी शासनाच्या नगररचना विभागाचे पथक (डीपी युनिट) नियुक्त केले आहे. त्यांनी तयार केलेला विद्यमान जमीन वापर नकाशा व अहवाल, नगर रचना अधिकाऱ्यांनी १४ ऑगस्ट रोजी महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात आला आहे. हा नकाशा नागरिकांना पाहण्याकरिता महानगरपलिका व विकास योजना विशेष घटक कार्यालयात, कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. तसेच सदर नकाशा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यमान जमीन वापर नकाशामध्ये काही सुधारणा किंवा त्रुटी असल्यास नागरिकांनी निदर्शनास आणून दिल्यास प्रस्तावित जमीन वापर नकाशा तयार करताना योग्य ती दखल घेण्यात येईल. त्यासाठी, नागरिकांनी किंवा संबंधित व्यक्तींनी कार्यालयास कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रभारी उपसंचालक तथा नगररचना अधिकारी पूनम पंडित व आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी याबाबत जाहीर सूचना प्रसिद्ध केली आहे. सदर नकाशा हा विकास योजना विशेष घटक, सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, तहसील कार्यालय समोर, अहिल्यानगर येथे व अहिल्यानगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे, असे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.




जन आधार सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे यांच्या वाहनावर अज्ञात व्यक्तीने हल्ला केला.

# प्रकाश पोटे यांच्या वाहनावर अज्ञात व्यक्तीचा हल्ला

नगर – जन आधार सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे यांच्या वाहनावर अज्ञात व्यक्तीने हल्ला केला. ही घटना निंबोडी येथे त्यांच्या राहत्या घरी घडली असून रात्रीच्या सुमारास त्यांच्या चारचाकी वाहनावर दगड फेकून गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. या घटनेचा निषेध संघटना तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नोंदवला आहे. हल्ला करणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा तातडीने शोध घेऊन त्याच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली असून याबाबत लवकरच निवेदन देण्यात येणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले आहे.

# नेवाशाचे भीमराज दराडे यांना अपर जिल्हाधिकारीपदी बढती



नगर – शिर्डी येथील साईबाबा संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांना अपर जिल्हाधिकारी या पदावर पदोन्नती मिळाली असून सरकारने त्यांची संस्थांनमध्येच पद उन्नत करून नियुक्ती केली आहे.

दराडे यांनी सुमारे सहा महिन्यांपूर्वी २७ फेब्रुवारीला शिर्डी येथील साईबाबा संस्थानच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदाचा कार्यभार स्वीकारला होता. आता त्यांना याच ठिकाणी अप्पर जिल्हाधिकारीपदी नियुक्ती मिळाली आहे. दराडे हे मूळचे नेवासे तालुक्यातील मोरया चिंचोरे येथील रहिवासी आहे. त्यांचे माध्यमिक शिक्षण सोनई तसेच नगरच्या रेसिडेन्शिअल कनिष्ठ महाविद्यालयात पूर्ण केले.

पुणे येथील कृषी महाविद्यालयातून कृषी पदविका तर राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत तहसीलदार पदी नियुक्ती झाल्यानंतर यवतमाळ येथून काम करण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर दुष्काळी परिस्थितीत नगर तालुका तहसीलदार म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट काम केले होते. प्रशासनामध्ये कार्यक्षम व स्वच्छ अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक आहे.

शिर्डी साईबाबा संस्थान मध्येही त्यांनी अल्पावधीतच आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या पदोन्नती नंतर त्यांचे अभिनंदन होत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

व्हटॅमिन ए, सी, थायमिन, पोटॅशियम, कॅल्शियम, लोह यांचा फणसात मोठ्या प्रमाणात समावेश असतो. पिकलेल्या फणसाचा पल्प करून तो पाण्यात उकळून ते पाणी प्यायल्यास ताजेतवाने तर वाटतेच, पण ह्रदयाचे विकार जडलेल्या व्यक्तींना त्याचा फायदाही होतो. फणसात मोठ्या प्रमाणावर असणारे पोटॅशिअम रक्तदाब कमी करण्यास मदत करत असल्याने ह्रदयावरील अनेक समस्यांवर उपायकारक ठरू शकतो. हाडांसाठी फणस खाणे खूप गुणकारी असते. या फळात असलेले मॅग्नेशियम आणि कॅल्शियम हाडांसाठी गुणकारी असते.

---------

बदाम हे पोषक तत्वांनी समृद्ध असतात. ते व्हिटॅमिन ई, फायबर, ओमेगा-३ फॅटी ॲसिड, प्रथिने आणि मॅंगनीजचे समृद्ध स्त्रोत आहेत. कच्च्या बदामांपेक्षा भिजवलेले बदाम खाणे अधिक आरोग्यदायी आहे. कच्च्या बदामांमध्ये तपकिरी रंगांचे टॅनिनि असतात, जे पोषक तत्त्वांचे शोषण रोखतात. भिजवल्याने साल निघून जाते आणि त्यातील सर्व चांगले गुण मिळतात.

## पाककला

### शेवया उपमा

**साहित्य :** १/२ बाउल शेवया, १ कांदा, १ टीस्पून मोहरी, १ टीस्पून जीरे, १ टीस्पून मीठ चवीनुसार, १ टीस्पून साखर, ३ टेबलस्पून तेल, ४-५ कडीपत्ता, ४ हिरव्या मिरच्या, कोथिंबीर, १/२ बाउल गरम पाणी

**कृती :** कांदा बारीक चिरून घ्यावा. आता कढईमध्ये तेल घालून गरम करून घ्यावे आणि मोहरी जीरे घालून फोडणी द्यावी. त्यानंतर हिरव्या मिरच्या आणि कढीपत्ता घालावा. आता बारीक चिरलेला कांदा घाला आणि लालसर परतून घ्यावा. त्यानंतर शेवया घालाव्यात आणि बारीक गॅस करून लालसर परतून घ्याव्यात. त्यानंतर १/२ बाउल गरम पाणी थोडे थोडे करून घालावे आणि शेवया परतत राहावे. त्यानंतर मीठ आणि साखर घालावी आणि १ मिनिटे झाकण ठेवून शिजू द्यावे. आता गॅस बंद करा आणि शेवया एका बाउलमध्ये काढून घाव्या आणि कोथिंबीर घालावी.

## सौंदर्य

* चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करण्यासाठी एक चमचे मुळ्याचा रस घेऊन त्यात लोणी मिक्स करून चेहऱ्यावर लावावे. २० मि. नंतर चेहरा धुवावा.

* नियमित जायफळाचा लेप लावल्याने चेहऱ्याला नैसर्गिक चमक मिळते. त्वचेवरील सुरकुत्या कमी करण्यासाठी जायफळाचा लेप फायदेशीर ठरतो. जायफळाचा लेप लावल्याने त्वचेचे पोषण होते.

* बदाम तेल व्हिटॅमीन ई ने समृद्ध असते. बदामाचे तेल स्किनसाठी खूप फायदेशीर आहे. ते स्किन सॉफ्ट करते.

## सल्ला

गाईचे दूध नासल्यानंतर त्या मधून निघालेले पाणी टाकून न देता त्याचा वापर चपात्या व पराठे मळण्यासाठी करा.

## वास्तू

मुलांचे अभ्यासाचे टेबल गोलाकार असू नये. आयताकार, चौकोनी असावा. 'कोन' कट नसावे. त्याचप्रमाणे बुट-चपलांचे स्टॅण्ड दारासमोर नसावे. घराला खेटून कचराकुंडी नसावी.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५

**दर्श-पिठोरी अमावास्या (पोळा), शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, आश्लेषा २४।१७, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : दिवस अनुकूल व महत्वाचा असेल. आपले अडकेलेले कार्ये पूर्ण होतील. आनंदाची बातमी मिळेल. विशिष्ट कार्य पूर्ण होतील. आरोग्य देखील उत्तम राहील.

**वृषभ** : नोकरदार व्यक्तींसाठी वातावरण अनुकूल राहील. आरोग्य देखील उत्तम राहील. कौटुंबिक सहयोग मिळेल. महत्वपूर्ण प्रश्नांचे निराकरण होईल.

**मिथुन** : वाहने काळजीपूर्वक चालवा. संतोषजनक स्थितीमुळे उत्साह वाढेल. प्रेयसीशी संपर्क होण्याची शक्यता आहे. मनोरंजनावर खर्च होईल.

**कर्क** : व्यापारासाठी प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जीवनाच्या आनंदात वाढ होईल. लेखन कार्यात यश मिळेल. कोणतीही अर्ज देण्यासाठी उत्तम वेळ.

**सिंह** : कामात किंचित अडचणी येतील पण धैर्यशील राहिल्याने कार्ये पूर्ण होतील. उल्हासाचा अनुभव येईल. शीघ्र अनुकूल परिस्थिती होईल.

**कन्या** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. आरोग्य उत्तम राहील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील.

**तूळ** : आपल्या आत्मविश्वासाचे, जोखीम घेण्याच्या वृत्तीचे प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी वरिष्ठांकडून कौतुक होईल.

**वृश्चिक** : येणारा काळ भूतकाळातील आनंद पुन्हा आणेल. एखाद्या प्रोजेक्टसाठी किंवा महत्त्वाच्या कार्यासाठी आपले प्रयत्न वाढविण्याची वेळ आली आहे.

**धनु** : आपल्या आयुष्यावर झालेले परिणाम पाहण्यासाठी आणि आपल्या संपूर्ण आयुष्याबद्दल गंभीररीत्या विचार करण्यासाठी या वेळी आपणास एकांताची आवश्यकता असू शकते.

**मकर** : आज नवीन संबंध स्थापित करणे, माहितीची देवाण-घेवाण व मीटिंगच्या माध्यमातून शिकवण्याची किंवा शिकण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : त्याची कसोटी घेणारा हा दिवस आहे. आपणास अधीर आत्मविश्वासाने परिपूर्ण वाटेल आणि कोणत्याही प्रतिस्पर्धी प्रयत्नासाठी हा वेळ उत्तम आहे.

**मीन** : अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेले कामे पूर्ण होतील. मित्रांचा सहयोग मिळेल. आपल्या प्रयत्नांमध्ये इतर लोकांची मदत घेतल्याने आपले कार्य किंचित सोपे होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# फिल्मीचक्कर क्र. १२०२ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ३ | ■ | ४ |
| | ■ | ■ | | ■ | | ■ | |
| ५ | ६ | ७ | ■ | ८ | ■ | ९ | |
| ■ | १० | | | | | | |
| ■ | | ■ | ■ | | ■ | ■ | ■ |
| ११ | | ■ | १२ | ■ | १३ | ■ | १४ |
| | ■ | १५ | | १६ | | १७ | |
| १८ | | | ■ | | ■ | | ■ |

**आडवे शब्द :-** १) रणदीप हुडा यांचा सावरकरांच्या जीवनावरील चित्रपट ++++++ सावरकर ५) संध्या, प्रशांत, मुमताज यांचा एक जुना चित्रपट ९) एक मराठी अभिनेता प्रसाद ++ १०) महाकुंभ मेळ्यात साध्वी बनलेली एक हिंदी चित्रपट अभिनेत्री ११) एक फूल दो ++ (चित्रपटाचे नाव) १५) राजीव कपूर, मंदाकिनी यांचा एक गाजलेला हिंदी चित्रपट १८) +++ तेरी कसम (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** १) +++ से सुंदर (चित्रपटाचे नाव) २) अक्षय खन्ना, ऐश्वर्या रॉय यांचा एक चित्रपट ३) ++ मुराद (अभिनेता) ४) अभिनेता, दिग्दर्शक आणि चित्रपट कथालेखक असलेला मराठी माणूस - अतुल ++++ ६) जितेंद्र, लीना चंदावरकर यांचा एक चित्रपट ७) ++ और शाम (एक चित्रपट) ८) बाल कलाकार आदिनाथ कोठारे याचा एक मराठी चित्रपट - माझा +++ ९) एक मराठी अभिनेता डॉ. गिरीश ++ ११) लक्ष्मीकांत बेर्डे, निशिगंधा वाड, उदय टिकेकर यांचा एक मराठी चित्रपट १२) मेरा ++ जोकर (चित्रपटाचे नाव) १३) गाय और ++ (चित्रपटाचे नाव) १४) ++ जमुना चित्रपटाचे नाव) १५) ++ बलराम (चित्रपटाचे नाव) १६) राम ++ कितने नाम (चित्रपट) १७) ++ की सौगंध (चित्रपट)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जर आपल्याला स्वर्गप्राप्ती करून घ्यायची असेल, तर नम्र बनलेच पाहिजे. कारण तिथे भिंती खूप मोठ्या असतात; परंतु दरवाजे लहान असतात. - **हरिक.**

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## एनिमा म्हणजे काय?

शौचास होत नसेल, तर कधी रुग्णास शस्त्रक्रियेपूर्वी पोट साफ होण्यासाठी गुदद्वाराच्या मार्गाने काही औषधी मोठ्या आतड्यात सोडतात, यास 'एनिमा' असे म्हणतात. जेवणात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश नसल्यास व आहार समतोल नसल्यास बद्धकोष्ठाचा त्रास होतो. कधी कधी मळाचे खडेही तयार होतात. लहान मुलांना संडास होत नसेल, तर कागदाची पुंगळी करून त्याला साबण लावून ती गुदद्वारात सारल्यास संडास होते किंवा गोडेतेल सोडल्यासही मळाचे खडे सुटतात व न दुखता संडास होते.

संडास होत नसल्यास पोटातून औषध घेण्यापेक्षा गुदद्वारातून उपचार करणे सोयीचे ठरते. एनिमामध्ये पाव लिटर, अर्धा लिटर साबणाचे पाणी रबरी नळीच्या साहाय्याने व्यक्तीच्या गुदद्वारातून आत सोडतात. नंतर मळाचे खडे सुटून संडास होते. विष्ठा गोळा करण्यासाठी भांड्याची सोयसुद्धा असते. आयुर्वेद चिकित्सापद्धतीने गुदद्वारावाटे औषधी प्रविष्ट करून चिकित्सा केली जाते. या चिकित्सेस बस्ती चिकित्सा म्हणतात. मळास बाहेर काढणे याशिवाय इतर अनेक व्याधींची चिकित्सा, औषधी काढे व तेल गुदद्वारावाटे देऊन केली जाते. एनिमाचा वापर वारंवार करण्यापेक्षा आहारात योग्य ते बदल घडवून आणणेच आरोग्यपूर्ण जीवनाच्या दृष्टीने चांगले.

## खरी मैत्री

एका मोठ्या जंगलात एक माकड आणि एक ससा खूप प्रेमाने राहत होते. दोघांची इतकी चांगली मैत्री होती की ते नेहमी एकत्र खेळायचे आणि सुख-दुःख वाटून घ्यायचे.

एके दिवशी खेळत असताना माकड म्हणाले, मित्रा, आज एक नवीन खेळ खेळूया. सशाने विचारले, मला सांग, तुला कोणता खेळ खेळायचा आहे?

माकड म्हणाले, आज आपण दोघांनी लपाछपी खेळायला हवी. ससा हसायला लागला आणि म्हणाला, ठीक आहे, चला खेळूया. खूप मजा येईल. जंगलातील सर्व प्राणी-पक्षी इकडे तिकडे धावत असल्याचे पाहून माकडाने लगबगीने जवळच्या कोल्ह्याला विचारले,

अरे, काय झाले? सगळे का पळत आहेत?

कोल्ह्याने उत्तर दिले, एक शिकारी जंगलात आला आहे, म्हणून आम्ही सर्वजण आपला जीव वाचवण्यासाठी धावत आहोत. तू सुद्धा पटकन पळाला नाही तर तो तुला पकडेल. असे बोलून कोल्हा पटकन तिथून पळून गेला.

कोल्ह्याचे बोलणे ऐकून माकड आणि ससा घाबरून पळू लागले. धावत धावत दोघेही त्या जंगलापासून दूर आले. मग माकड म्हणाले, मित्रा सश्या, आपण सकाळपासून धावत आहोत. आता संध्याकाळ झाली. चला, थोडी विश्रांती घेऊया. मी थकलोय.

ससा म्हणाला, हो, थकलोच नाही तर खूप तहानही लागली आहे. चला थोडं पाणी पिऊया. मग आपण आराम करू. माकड म्हणाले, मलाही तहान लागली आहे. चला, पाणी शोधूया.

दोघेही एकत्र पाणी शोधण्यासाठी बाहेर पडले. काही वेळातच त्याला पाण्याचे भांडे सापडले. त्यात फारच कमी पाणी होते. आता ससा आणि माकड दोघांनाही वाटले की आपण हे पाणी प्यायले तर आपला मित्र तहानलेलाच राहील.

आता ससा म्हणू लागला, मित्रा तू पाणी पि. मला फार तहान नाही. तू खूप धावला आहेस, त्यामुळे तुला खूप तहान लागली असेल.

तेव्हा माकड म्हणाले, मित्रा, मला तहान लागली नाही. तु पाणी पी. मला माहीत आहे तुला खूप तहान लागली आहे.

दोघेही एकमेकांना वारंवार पाणी पिण्यास सांगत होते. जवळून जाणारा हत्ती थोडावेळ थांबला आणि त्यांचे संभाषण ऐकू लागला.

काही वेळाने हत्तीने हसून विचारले, तुम्ही दोघे पाणी का पीत नाही?

ससा म्हणाला, हे बघ हत्ती दादा, माझ्या मित्राला तहान लागली आहे, पण तो पाणी पीत नाही.


माकड म्हणाले, नाही नाही दादा, ससा खोटे बोलत आहे. मला तहान लागली नाही. त्याला तहान लागली आहे, पण तो मला पाणी देण्याचा आग्रह धरतो.

हे दृश्य पाहून हत्ती बोलू लागला, तुमच्या दोघांची मैत्री खूप घट्ट आहे. हे सर्वांसाठी एक छान उदाहरण आहे. तुम्ही दोघे हे पाणी का पीत नाही. तुम्ही दोघेही हे पाणी अर्धे वाटून पिऊ शकता.

ससा आणि माकड दोघांनाही हत्तीची सूचना आवडली. त्याने अर्धे पाणी प्यायले आणि मग थकवा घालवण्यासाठी विश्रांती घ्यायला सुरुवात केली.

तात्पर्य : खऱ्या मैत्रीत स्वार्थाला स्थान नसते.

# जीवन का अमृत (भाग १)



## गुरू और परमात्मा

जब किसी महापुरुष का सत्संग करने का मुझे अवसर मिला और उन्होंने दया-मेहर करके नाम की देन बख़्श दी । इस पंक्ति में गुरु अर्जनदेव जी महाराज परमात्मा का शुक्राना कर रहे हैं । आपने मुझ पर इतनी दया-मेहर की कि मुझे किसी महापुरुष की संगत में भेज दिया । यहाँ सत्संग का महत्त्व बताया गया है । हर महापुरुष ने सत्संग की महिमा बताई है । संत तुलसी साहिब ने 'घट रामायण' में लिखा है कि ६५ हजार वर्ष की तपस्या से ढाई घड़ी सत्संग का फल ज़्यादा है । गुरु नानकदेव जी की जिंदगी की एक घटना है : एक साहूकार को गुरु नानकदेव जी के साथ एक घंटा रहने का मौका मिला । सारी जिंदगी साहूकार ने गलत काम किये थे । गुरु नानकदेव जी ने उसे बताया कि ७ दिन बाद उसकी मौत हो जाएगी । गुरु नानकदेव जी ने साहूकार को समझा दिया कि जब यमराज उससे पूछे कि पहले अच्छे कर्म का फल चाहिए या बुरे कर्मों का भुगतान, तो पहले वह अच्छे कर्म का फल माँग ले । साहूकार ने ऐसा ही किया । सारी जिंदगी में उसका अच्छा कर्म यही था कि उसने एक घंटे का सत्संग सुना था । उसे अंतर के मंडलों में ले जाया गया, जहाँ गुरु नानकदेव जी सत्संग कर रहे थे । वह हैरान हो गया और एक घंटे के बाद जब यमराज उसे वापिस लेने आये, तो गुरु नानकदेव जी ने कहा, यह फल जो उसे मिला है, यह पिछले सत्संग का है । जो सत्संग इसने यहाँ सुना है, इसका भी फल इसे मिलना चाहिए । इस प्रकार वह यमराज के हाथों से बच गया । (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## आज्ञा चक्र

ऐसे आश्चर्यजनक निरीक्षण के पश्चात उन्होंने लगभग २५ प्रकार की वनस्पतियों पर देश के अलग-अलग भागों में, अलग-अलग लोगों द्वारा लाय डिटेक्टर के जरिए प्रयोग करवाये और सभी जगह उन्हें पहले जैसा ही परिणाम दिखाई दिया । इससे सिद्ध होता है कि वनस्पतियाँ विचार करती हैं । उन्होंने आगे जाकर यह भी बताया कि कोई भी वृक्ष या वनस्पति और उसकी पालना करने वाले व्यक्ति में एक अटूट रिश्ता बनता है । ऐसे व्यक्ति चाहे उस वृक्ष या वनस्पति के नजदीक हों या कितने भी दूर हों तो भी वे सम विचारोंवाले मित्रों की तरह अपने संकल्पों के आधार से अपने दिल की भावनाओं को वृक्ष, वनस्पति तक पहुँचाते हैं और वनस्पतियाँ भी उसी अनुरूप अपनी प्रतिक्रियायें देती रहती हैं ।

मानस भौतिक शास्त्र के जनक 'फेहनर' ने अपने प्रयोग द्वारा सिद्ध किया है कि वनस्पतियों में भी व्यक्तित्व होता है । वनस्पतियों को स्वयं को लगनेवाली अन्न की जरूरत कितनी है यह मालूम पड़ता है और अपनी जरूरत अनुसार उसे आपे ही वह प्राप्त करना आता है । सिर्फ उनको जानना या प्राप्त करने का मार्ग अलग है । अल्ब्रेट हीली नाम के संशोधक ने 'दी ओरिजीन ऑफ इनॉर्गेनिक सबस्टेन्सेस' नामक किताब लिखी । इस किताब में उन्होंने सिद्ध करके बताया कि वनस्पति केवल अन्न घटक ही तैयार नहीं करती है परन्तु यह एक जादूगरनी भी है । एक मूलद्रव्य का रूपांतरण दूसरे मूलद्रव्य में करने की शक्ति भी वनस्पतियों में है । आवश्यकता अनुसार वनस्पति स्फुरद का गंधक में, कैल्शियम का फॉस्फेट में, मैग्नेशियम का कैल्शियम में, कार्बोनिक एसिड का मैग्नेशियम में और नाइट्रोजन का पोटॉशियम में रूपांतर करते हैं । वनस्पति नई रचना नियमित तापमान में कम-से-कम ऊर्जा खर्च करके करती है, यह भी उन्होंने सिद्ध किया है। 'चार्ल्स डार्विन' नाम के इंग्लिश वैज्ञानिक ने स्पष्ट किया है कि वनस्पतियों में ऐसी अकल्पनीय शक्ति होती है, जिस द्वारा वनस्पतियों को समझ वा द्धि प्राप्त होती है । उन्होंने अपनी 'दी पॉवर ऑफ मूवमेन्ट्स इन प्लान्ट्स' किताब में लिखा है कि वनस्पतियों की जड़ों की मूल में जो जीवाणु होते हैं वे ब्रेन के समान कार्य करते हैं, ऐसा कहने में कोई हर्जा नहीं । ये पेशियाँ, वनस्पतियों के लिए सन्देश ग्रहण करने और हलचल को नियंत्रण करने का कार्य करती हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# हसा आणि शतायुषी व्हा!

राजूच्या शाळेचा पहिला दिवस होता. त्यामुळे घरी येताच वडिलांनी त्याला विचारले.

वडील : राजू शाळा आवडली का तुला?

राजू : हो

वडील : बाई चांगल्या आहे का?

राजू : हो

वडील : हुशार आहेत का?

राजू : हुशार आहेत की नाहीत कोण जाणे, पण त्यांना माझ्यापेक्षा बरेच जास्त येते.

# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* देशातील पहिली इलेक्ट्रॉसिटी पॉटर टॅक्सी सेवा कोणत्या राज्यात सुरू होणार आहे?

- महाराष्ट्र

**- अरविंद ब्राम्हणे,**

भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

## आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

न खाणे हितावह आहे. या ऋतूमध्ये अनेक सण असतात. या सणांमध्ये पुरणपोळी खाण्याची पद्धत आहे व ती खाणे या ऋतूत आरोग्यासाठी लाभदायक असते. कारण गूळ, गहू हे मधुर रसात्मक पदार्थ व डाळ तुरट रसाची असल्यामुळे या ऋतूमध्ये होणारा पित्तप्रकोप कमी होतो. तसेच गायीचे दूध, तूप हे पदार्थ मधुर रसात्मक व शरीराचे बळ वाढविणारे असल्याने नेहमी खावेत. पुरणपोळी दूध व तुपाबरोबर खावी. नारळी पौर्णिमेला गोड नारळीभात करतात. ओले खोबरे मधुर रसाचे व पित्त कमी करणारे असते. म्हणूनच पित्तप्रकोप व त्यापासून उद्भवणाऱ्या आजारांचा त्रास होऊ नये म्हणून नारळीभात खावा. ओल्या नारळापासून बनविलेली खीर, बर्फी व लाडू खावा. विविध सणांना बासुंदी, शिरा यांसारखे पदार्थ खावेत. फक्त हे पदार्थ जड असल्याने जास्त न खाता योग्य मात्रेत खावेत.

भात, पोळी व ज्वारीची भाकरी असे मधुर रसात्मक पदार्थ खावेत. तसेच हरभरा, मटकी, मूग, चवळी व वाटाणे ही कडधान्ये व त्यापासून बनविलेल्या डाळी तुरट रसाच्या असल्याने त्यांचा आहारामध्ये समावेश करावा. भाज्यांमध्ये मेथी, शेपू, कारले अशा कडू चव असलेल्या भाज्या खाव्यात. कारण कडू रसामुळे पित्तप्रकोप होत नाही. कढीलिंब, हळद, धणे, जिरे, कोथिंबीर फोडणीसाठी वापरावी. कारण हे पदार्थ थंड गुणाचे असून, पित्त कमी करणारे असतात. परंतु मसाल्याचे इतर पदार्थ व तिखट मिरची यांचा वापर कमी करावा. आंबट, खारट पदार्थ या ऋतूत खाऊ नयेत. फळांमध्ये चिकू, अंजिर, खजूर, ओला नारळ, आवळा, संत्री, मोसंबी ही फळे खावीत. या ऋतूत व्रतवैकल्ये असल्यामुळे बरेचजण साबुदाण्याची खिचडी, शेंगदाणे, तसेच तळलेले बटाट्याचे वेफर्स, चिवडा, पापड्या भरपूर खातात. परंतु हे सर्व पदार्थ पित्त वाढविणारे असल्याने आम्लपित्त, अपचन, उलट्या व मळमळ, मूळव्याध, जुलाब, कावीळ, डोकेदुखी हे आजार उद्भवतात. तसेच स्त्रियांना पाळीमध्ये जास्त रक्तस्राव होणे, पाळी वेळेच्या आधी लवकर येणे ही लक्षणे या ऋतूत जास्त दिसून येतात. म्हणून उपवास असताना फक्त फळे, ड्रायफ्रुट्स, फळांचा रस, शहाळ्याचे पाणी अशा प्रकारचा आहार घ्यावा. उष्णता व पित्तप्रकोपामुळे या ऋतूत अति गरम जेवण करू नये. जेवण थोडे कोमट झाल्यावरच जेवावे.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



न्यूयॉर्कमध्ये आयोजित इंडिया डे परेडमध्ये महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचे दर्शन घडविणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा कीर्तीरथ दिमाखात सादर करण्यात आला.

# न्यूयॉर्कमध्ये शिवछत्रपतींची मिरवणूक

**छत्रपती फाउंडेशनतर्फे आयोजन**

नगर – भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने १७ ऑगस्ट रोजी न्यूयॉर्कमध्ये आयोजित इंडिया डे परेड मध्ये महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचे दर्शन घडविणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा कीर्तीरथ दिमाखात सादर करण्यात आला. छत्रपती फाउंडेशनच्या वतीने सजविण्यात आलेल्या या कीर्तीरथाने सातासमुद्रापारही मराठी संस्कृतीचे अनोखे दर्शन घडवले, अशी माहिती आखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे सदस्य शिवव्याख्याते ओंकार व्यवहारे यांनी दिली.

या परेडला अमेरिकेचे विविध भाग तसेच भारतातील हजारो नागरिकांनी उपस्थित राहून उत्साहात सहभाग नोंदवला. यावर्षी ग्रँड मार्शल चा मान अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा यांना मिळाला. मिशिगन राज्याचे यूएस हाऊस ऑफ रेप्रेसेंटेटिव्हजचे खासदार श्री. श्री ठाणेदार हे कीर्तीरथावर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी रथावरून रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या जनसमुदायाला अभिवादन केले. न्यूयॉर्क शहराचे महापौर एरिक आडम्स यांनी परेडची औपचारिक सुरुवात केली तर भारताचे न्यूयॉर्क येथील राजदूत बिनया प्रधान यांनी छत्रपती फाउंडेशनच्या उपक्रमांचे मनापासून कौतुक केले.

कीर्तीरथावर छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ, बालशिवबा आणि मावळ्यांचे सजीव चित्रण करण्यात आले. बालक, महिला व युवकांनी ऐतिहासिक पोशाख परिधान करून केलेल्या अभिनयाने वातावरण भारावून गेले. यावेळी जल्लोष ढोल–ताशा पथकाचे ५० हून अधिक वादकांनी अवघे न्यूयॉर्क दुमदुमवले. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या रुद्र डान्स अॅकॅडमी च्या मुलींनी लेझीम व विविध नृत्य सादर केले. या निमित्ताने शंभरहून अधिक कलाकारांनी महाराष्ट्राचा समृद्ध इतिहास व लोककला अमेरिकन जनतेसमोर भव्य स्वरूपात मांडली.

या परेडमध्ये भारतीयांसह अमेरिकन नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. मॅडिसन अव्हेन्यू भगवामय झाल्याचे दृश्य सर्वांना भावणारे होते. New York Parade Life या वृत्तपत्राने शिवछत्रपती कीर्तीरथाला Best Float असा बहुमान देत, शिवराज्याचा संदर्भ अमेरिकेच्या लोकशाही मुळांशी जोडला असल्याचे नमूद केले.

गेल्या १५ वर्षांपासून छत्रपती फाउंडेशन, न्यूयॉर्क ही संस्था शिवजयंती, जिजाऊ जयंती, अहिल्यादेवी होळकर जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अशा अनेक सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन सातत्याने करत आहे. नुकतेच त्यांनी भारतीय दूतावासात शिवजयंतीचा सोहळा साजरा केला होता. फेडरेशन ऑफ इंडियन असोसिएशन्स तर्फे दरवर्षी आयोजित केली जाणारी इंडिया डे परेड यंदा छत्रपती फाउंडेशनच्या कीर्तीरथामुळे विशेष लक्षवेधी ठरली.

या उपक्रमाच्या यशामागे फाउंडेशनच्या दहा राज्यांमधून आलेल्या सदस्यांची मेहनत असून ढोल–ताशा पथक व रुद्र डान्स अॅकॅडमीच्या कलाकारांचे योगदान कौतुकास्पद ठरले. या उपक्रमामुळे छत्रपती फाउंडेशनने अमेरिकन भूमीवरही मराठी संस्कृतीचा मानाचा तुरा उंचावला आहे.

# स्वरांकित म्युझिक अकॅडमीतर्फे २५ ऑगस्टपासून नगर शहरात मोफत संगीत कार्यशाळेचे आयोजन




नगर – स्वरांकित म्युझिक अकॅडमीमार्फत २५ ऑगस्ट पासून ५ दिवसीय मोफत संगीत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मुलांची संगीताची गोडी वाढावी, त्यांच्यावर संगीताचे चांगले संस्कार व्हावेत या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या धकाधकीच्या जीवनात संगीत किती महत्वाचे आहे याची सर्वांना कल्पना आहेच. संगीत ही गुरुमुखी विद्या आहे ही समोर बसूनच आत्मसाद करावी लागते त्यामुळे ऑनलाईन न शिकता समोर प्रत्यक्ष मुलांनी शिकावे हा यामागे हेतू आहे. विशेष बाब म्हणजे कार्यशाळेसाठी वयाची कोणतीच अट घालण्यात आली नाही. वय वर्ष ३ पासून पुढे ७५ वयापर्यंत प्रवेश दिले जाणार आहेत. त्यामुळे पालक सुद्धा कार्यशाळेत सहभागी होऊ शकतात.

तबला, ढोलक ढोलकी, पखावज, कीबोर्ड, गिटार, गायन, हार्मोनियम अशा विविध प्रकारच्या कला कार्यशाळेत शिकू शकता. या कार्यशाळेची वेळ संध्याकाळी ७ ते ८ अशी आहे.

कार्यशाळेचा पत्ता – स्वरांकित म्युझिक अकॅडमी, श्री सांदीपनी अकॅडमी समोर, एचडीएफसी बँक जवळ, पाईपलाईन रोड अहिल्यानगर. या कार्यशाळेचा फायदा करून घ्यावा असे आवाहन ऋषिकेश कुलट यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी ९९२२८०९०९०/ ९९२२५१०२०२.

# नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्टच्या बोगस विश्वस्तांची चौकशी करण्याचे आदेश

नगर – नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्टचे अधिकृत इसम म्हणून युनूस सुलतान तांबटकर यांनी धर्मदाय उपआयुक्त, नगर यांच्याकडे, इफ्तेकार इस्माईल खान, रेहान शफी काझी, इनामउल्ला जिकरिया खान, वाजीद जावेद खान, मोबीन अहमद महमदसाब तांबटकर, इफ्तिकार अकील खान, समी जुबेर तांबटकर, परवेज खान उमर खान तांबट, आसिफ अब्दुल रहमान शेख, इकराम तस्लिम खान यांनी कोणताही कायदेशीर अधिकार नसताना संस्थेचे रोख स्वरूपात पैसे जमा केले, त्यांच्याविरुद्ध तक्रार करण्यात आली होती. न्यायालयाने वेळोवेळी संधी देऊन सुद्धा बोगस लोकांनी पुरावे देऊ न शकल्या कारणाने धर्मदाय आयुक्त यांनी संबंधित लोकांविरुद्ध सखोल चौकशीचे आदेश प्रारित केले आहे.

तरी ज्या लोकांनी रोख स्वरूपात वरील लोकांना पैसे दिले असल्यास आम्हास कळवावे या मुळे न्यायालयाच्या कामकाजात मदत होईल असे युनूस सुलतान तांबटकर यांनी आवाहन केले आहे. अर्जदारांतर्फे अॅड. बल्लाळ यांनी कामकाज पाहिले.

# नगर शहरात प्रथमच २५ ऑगस्टला रंगणार सा रे ग म प फेम, पार्श्वगायिका आर्या आंबेकर यांची मराठी व हिंदी गीतांची मैफल



नगर – पुनीत बालन ग्रुप सादर तालचक्र युवा, पुणे व अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात २५ ऑगस्ट रोजी सायं. ६.३० वाजता नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड येथे सा रे ग म प फेम, महाराष्ट्राची युवा पार्श्वगायिका आर्या आंबेकर यांची मराठी व हिंदी गीतांची मैफल सादर होणार आहे.

आर्या आंबेकर श्रळींश ळप उेपलशीीं पहिल्यांदाच अहिल्यानगर शहरात होत आहे. तसेच कार्यक्रमाला पद्मश्री पं. विजय घाटे आदी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास देणगी प्रवेशिका शहराच्या विविध भागात उपलब्ध आहेत. प्रवेशिका मिळण्याचे ठिकाण – अरुणोदय औषधालय, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड, सावेडी. श्रेया सुवर्णपाठकी ७९७२०२४०५९ एकविरा चौक, श्रीराम चौक, तपोवन. राज ऑप्टिकल्स, प्रोफेसर चौक, सावेडी. हॉटेल स्वीट होम, प्रेमदान चौक, सावेडी. करंदीकर हॉस्पिटल, सिद्धार्थनगर, लालटाकी, बालीकाश्रम रोड. गोपाल चष्मावाला स्टेट बँकेसमोर समोर, दिल्लीगेट. विलास बडवे ८६६८७८५६४०, ९४२२०८४११० अर्बन बँक कॉलनी, आनंदऋषी हॉस्पिटल जवळ, बुरुडगाव रोड, मार्केट यार्ड, सारसनगर. ओंकार देऊळगावकर ९५१८७३३९४६ भिंगार, दरेवाडी. योगेश पंडित ९०२८८ ३१३२७ केडगाव. आनंद कुलकर्णी ९३०९७१८१५१ कल्याण रोड. सौ. अमृता बेडेकर ९६७३५५८००७ नगर शहर, अशी माहिती अनाहत एक कलासृष्टीचे अध्यक्ष प्रसाद सुवर्णपाठकी यांनी दिली.

# युवा कौशल्य संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण घेऊन महिला होत आहेत स्वावलंबी

**ईश्वर निमसे यांचे प्रतिपादन; सरपंच प्रियंकाताई लामखडे यांचेकडूनही अभिनंदन**



युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगरच्या मार्फत निंबळक येथे महिला सक्षमीकरण अंतर्गत आरी वर्क प्रशिक्षणामध्ये सहभागी झालेल्या महिला.

नगर – युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगर च्या मार्फत निंबळक ता. नगर जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी महिला सक्षमीकरण चा प्रमुख उद्देश डोळ्यासमोर ठेवून आरी वर्क प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी गावातील महिलांनी आरी वर्कचे उत्कृष्ट पद्धतीने पूर्ण केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा सांगता समारंभ संस्थेचे अध्यक्ष ईश्वर निमसे यांच्या हस्ते महिलांना प्रमाणपत्र वितरण करून करण्यात आला. यावेळी महिलांनी स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे व आपले व्यवसाय करावेत आणि सक्षम कुटुंब घडवावे. असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष ईश्वर निमसे यांनी केले. त्यांनी महिलांना मार्गदर्शन करताना संस्थेच्या कामाबद्दल माहिती सांगितली. तसेच महिलांनी या व्यवसाय प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपली एक वेगळी ओळख निर्माण करून समाजामध्ये मानाचे स्थान तयार करावे अशाप्रकारे महिलांना आश्वस्थ करून महिलांना पुढील काळामध्ये संस्थेमार्फत जी काही मदत लागेल ती मदत करण्याची ग्वाही दिली.

यावेळी कार्यक्रमास निंबाळक ग्राम पंचायतच्या सरपंच प्रियांकाताई लामखडे उपस्थित होत्या. त्यांनी महिलांनी केलेल्या कामाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाप्रसंगी कृषी आमोद गटाच्या अध्यक्षा सौ. निकीता अमित कोरडे आणि अष्टक गृह उद्योगाच्या अध्यक्ष सौ. सुरेखा दशरथ घोलप आणि सुनंदा बापू साखरे, उमेद अभियानाच्या सी.आर.पी. पगारेताई तसेच प्रशिक्षणाच्या प्रशिक्षिका अक्षदा भोळे उपस्थित होत्या.

सौ. आशाताई खांडेकर यांनी प्रशिक्षणासाठी जागा उपलब्ध करून देऊन संस्थेस सहकार्य केले.

# एक पेड माँ के नाम हा संकल्प घेऊन प्रत्येकाने एक झाड लावलेच पाहिजे

**सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांचे प्रतिपादन; भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलाचा उपक्रम**




महिलांना रोप वाटप करतांना भाजपा सावेडी मंडलाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे, मनिषा बारस्कर– काळे, उपाध्यक्ष सुधीर मंगलारप, सरचिटणीस साहिल शेख, अॅड. रुद्रेश अंबाडे

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक पेड माँ के नाम हा महत्वाकांक्षी उपक्रम आहे. त्यामुळे प्रत्येकाने कमीत कमी एक झाड लावलेच पाहिजे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांनी केले. ते सावेडी मंडलाच्या वतीने आयोजित वृक्ष दत्तक योजना कार्यक्रमात बोलत होते.

सध्या जागतिक हवामानात सतत बदल होत आहेत हे आपण प्रत्यक्षात अनुभवतोय. पावसाळी वातावरण असूनही पाऊस मात्र पडत नाही. यासाठी वेगवेगळी कारणे असली तरी एक मुख्य कारण म्हणजे झाडे तोडली जाणे व त्यानंतर एकही झाड न लावणे. हा असमतोल भरून काढावयाचा असेल तर प्रत्येकाने किमान एक झाड लावलेच पाहिजे असे प्रतिपादन राजेंद्र काळे यांनी केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांच्या माध्यमातुन ही सर्व रोप उपलब्ध झाली आहेत.

सावेडी मंडलाच्या अध्यक्षा रेणुका करंदीकर म्हणाल्या की, आम्ही पवित्र अशा श्रावण महिन्यात मंगळागौरीच्या निमित्ताने प्रत्येक महिलेला एक झाड लावण्याचे आवाहन केले होते. त्याप्रमाणे आम्ही त्यांच्याकडून एक फॉर्म भरून घेतला आहे. त्यात त्यांचे नाव, पूर्ण पत्ता, मोबाईल नंबर, झाड जिथे लावणार आहे त्या ठिकाणचा पत्ता, आईचे नाव इ. माहिती आम्ही भरून घेतली आहे.

सावेडी मंडलाच्या उपाध्यक्षा शारदा होशिंग म्हणाल्या की, आम्हाला एकूण ३०० महिलांनी असा फॉर्म भरून दिला आहे आणि आम्ही त्यांना रोपे दिली आहेत. रोप लावल्यानंतर आम्ही त्यांच्याकडून सेल्फी मागवून घेणार आहोत. पुढील वर्षी त्यांनी लावलेली रोपे किती वाढले, त्याचे संगोपन, संवर्धन व्यवस्थित झाले का यासाठी स्पर्धा घेऊन बक्षीस देणार आहोत. उद्देश एकच आहे की प्रत्येक महिलेने आपल्या आईच्या नावे लावलेले झाडाचे संगोपन करावे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सावेडी मंडलाचे सरचिटणीस साहिल शेख, उपाध्यक्ष सुधीर मंगलारप, वंदना पंडित, प्रतिक्षा रसाळ, अनिरुद्ध घैसास, वैभव झोटिंग, मा. नगरसेवक रामदास आंधळे, संपत नलवडे, रुद्रेश अंबाडे, महिला मोर्चाच्या अध्यक्षा प्रियाताई जानवे, गीताताई गिल्डा, कालिंदीताई केसकर, अर्चना बनकर, सविता मोरे, सोनाली फाटक, सुरेखा जंगम, राखी आहेर, पल्लवी जाधव, श्वेता झोंड, उज्वला भांगे, प्रज्ञा जोशी, सुवर्णा महापुरुष यांनी परिश्रम घेतले.

# अमृतवृक्ष कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपण



अमृतवृक्ष कार्यक्रमांतर्गत आरोग्य सेवा (कुष्ठरोग) कार्यालयाच्या परिसरात सहाय्यक संचालक डॉ. राजेंद्र खंडागळे यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण झाले.

नगर – अमृतवृक्ष कार्यक्रमांतर्गत आरोग्य सेवा (कुष्ठरोग) कार्यालयाच्या परिसरात सहाय्यक संचालक डॉ. राजेंद्र खंडागळे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. निवेदिता माने, वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योती मांडगे, कुष्ठरोग पर्यवेक्षक मोतीराम नागरगोजे, संजय दुशिंग, विठ्ठल मोढळे, वैद्यकीय सहाय्यक श्रीनिवास पोकळे, रोहिणी गायकवाड आदी उपस्थित होते.

डॉ. राजेंद्र खंडागळे म्हणाले, प्रत्येकाने आपली जबाबदारी समजून रोपण केलेल्या प्रत्येक वृक्षाची काळजी घेऊन त्याचे योग्य पद्धतीने संगोपन करावे. अधिकाधिक वृक्ष वाढीसाठी प्रयत्न करून हरित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करूया, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रीतम कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन संजय दुशिंग यांनी केले. विठ्ठल मोढळे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील पवार, समीर सय्यद, विशाल माने, नंदा पवार, मॅडम, नितीन पानसरे, संजय भैलुमे, श्री. क्षीरसागर, शिंदे, बबन शिंदे, प्रीतम कुलकर्णी, महेश धसे, ज्योती बेळमकर, सुनील गवळी, सुरेश शिंदे व मनोज नरोटे यांनी परिश्रम घेतले.




विजय ट्रेडर्स या दालनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. (छाया – लहू दळवी)

# डाळमंडई येथे विजय ट्रेडर्स नूतन दालनाचा शुभारंभ

नगर – डाळमंडई व्यापारी बाजारपेठेत विजय ट्रेडर्स या नूतन दालनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी विजय मुथियान, सरला मुथियान, हरकचंद मुथियान, अमृतलाल मुथियान, बापूलाल पोखरणा, चंपालाल गांधी, इंजि. परेश मुथियान, भूषण बिहाणी आदी उपस्थित होते.

विजय मुथियान म्हणाले की, श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण या ग्रामीण भागातून आम्ही कुटुंबासह नगरमध्ये आलो. सुरुवातीला नोकरी केली. १९८८ पासून स्वतःच्या मेहनतीवर सायकल व लुना एम–८० वर दारोदार वस्तू पोहोचवत ग्राहकांमध्ये विश्वास संपादन केला. ३५ वर्षांच्या चिकाटी, प्रामाणिकपणा व जिद्दीच्या जोरावर आज 'विजय ट्रेडर्स' या स्वरूपात व्यवसाय उभा केला. ग्राहकांना दर्जेदार माल व वाजवी दर हीच आमची ताकद आहे. त्यांनी पुढे सांगितले की, व्यवसायाबरोबरच मुलाला उच्च शिक्षण देऊन सिव्हिल इंजिनीअर केले. या प्रवासात कुटुंबातील भाऊ व मेहुण्यांचीही मोठी साथ लाभली.

यावेळी उद्योजक राजेश भंडारी, विकी जगताप, संजय चोपडा, भगवान फुलसौंदर, पुण्याचे व्यापारी चंपालाल गांधी, घोटीचे व्यापारी बापूलाल पोखर्णा, सुभाष पोखर्णा, पेमराज पोखर्णा, उद्योजक गोवर्धन बिहाणी, हरकचंद मुथियान, अमृत मुथियान, अनिल पोखरणा, धनेश मुनोत, शाम गुलाटी उपस्थित होते.

# चित्रकूट इंटरनॅशनल स्कूल मध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलमध्ये पहलगाम येथील हल्ल्यावर आधारित 'ऑपरेशन सिंदूर' हे नृत्यनाट्य सादर करत स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

नगर – चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. देशभक्ती ही केवळ भावना नाही, ती जीवन जगण्याची ऊर्जा आहे या भावनेला साकार करत शाळेने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत कार्यक्रमाचे आयोजन केले.

सौरभ शिंदे सरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'ऑपरेशन सिंदूर' हे नृत्यनाट्य पाहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यावर आधारित होते. या हल्लयात प्राण गमावलेल्या नागरिकांना वाहिलेली ही अनोखी श्रद्धांजली प्रेक्षकांच्या मनाला स्पर्शून गेली. शौर्य, बलिदान, वेदना आणि देशभक्तीचा संगम असलेल्या या सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यांत अभिमान व अश्रू दोन्हीही दाटले. हे नाट्य शाळा तसेच कोहिनूर मॉल या दोन्ही ठिकाणी सादर करण्यात आले.

स्वातंत्र्यदिनानिमित्त सादर झालेल्या फ्लॅश मॉब गायनानेही प्रेक्षकांना भारावून टाकले. तब्बल २०० विद्यार्थ्यांचे स्वर, ६५० चौ. फुटांचा तिरंगा आणि वंदे मातरमचा गजर यामुळे वातावरण देशभक्तीने दुमदुमून गेले. महेश राऊत व ऋषिकेश घोडेकर सरांच्या मार्गदर्शनाखाली हे सादरीकरण झाले.

शाळेचे संचालक संजय चव्हाण व प्राचार्य अशोक सचदेव यांच्या प्रेरणेमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. पालकांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाच्या आयोजनात व व्यवस्थापनात सक्रिय सहकार्य दिले.

कार्यक्रमाचा आणखी एक आकर्षण ठरलेले रॉकेट प्रक्षेपण सर्वांसाठी रोमांचक ठरले. शाळेतून ३ आणि कोहिनूर मॉलमधून १ असे एकूण ४ रॉकेट्स तब्बल ५,००० फूट उंचीवर झेपावली. आयडियम संस्थेच्या युवा शास्त्रज्ञ पूजा वायळ व संचालक रवीशंकर कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या प्रक्षेपणाला ISRO च्या वर्धापन दिनाला अर्पण करण्यात आले होते.

९ वीतील वसुंधराने दिलेल्या प्रभावी भाषणाने कार्यक्रमाला विशेष उठाव मिळाला. तिच्या ओजस्वी शब्दांनी प्रेक्षकांच्या मनात अभिमान आणि प्रेरणा जागवली. सूत्रसंचालनाची जबाबदारी शिवम अव्हाड व पायल राऊत या विद्यार्थ्यांनी उत्तमरीत्या पार पाडली.

# पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या प्रवेश अर्जासाठी मुदतवाढ

नगर – इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी तसेच वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजने अंतर्गत प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यास २७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद लोंढे यांनी दिली आहे.

बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. अशा बारावीनंतरच्या पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसह एम.ए., एम.एस्सी. अशा पदवीनंतरच्या पदव्युत्तर (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर २७ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

२८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत अर्जांची छाननी करण्यात येणार असून, गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी ३ सप्टेंबर रोजी जाहीर केली जाईल. पहिल्या यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत १२ सप्टेंबर पर्यंत राहणार आहे.

रिक्त जागांसाठी प्रतीक्षा यादीतील गुणवत्तेनुसार दुसरी निवड यादी १५ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम तारीख २३ सप्टेंबर निश्चित करण्यात आली आहे.

# महावितरणच्या गलथान कारभारामुळे कमी-जास्त होणाऱ्या वीज होल्टेजच्या समस्येमुळे २ महिन्यांपासून नागरिक त्रस्त

## तातडीने विजपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन : दत्ता गाडळकर

नगर - महावितरणच्या गलथान कारभारामुळे सतत कमी-जास्त होणाऱ्या वीज होल्टेजच्या समस्येमुळे दोन महिन्यांपासून कल्याण रोड परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. या समस्येमुळे परिसरातील अनेक घरांमध्ये पाण्याच्या मोटारी, पंखे, संगणक, टीव्ही व इतर इलेक्ट्रिकल वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे.

या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी भाजपचे दत्ता गाडळकर यांच्या नेतृत्वाखालील नागरिकांच्या शिष्टमंडळाने महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी विशाल खैरे, विजय गायकवाड, सुरेश लालबागे आदी उपस्थित होते.



महावितरणच्या गलथान कारभारामुळे सतत कमी-जास्त होणाऱ्या वीज होल्टेजच्या समस्येमुळे लक्ष वेधण्यासाठी भाजपचे दत्ता गाडळकर यांच्या नेतृत्वाखालील नागरिकांच्या शिष्टमंडळाने महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांची भेट घेऊन निवेदन दिले.

कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी या प्रश्नाची तात्काळ दखल घेत दुरुस्तीसाठी कर्मचारी पाठवले असून लवकरच वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, हा प्रश्न सुटला नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे.

महावितरणच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांना सतत होणाऱ्या कमी-जास्त होल्टेजमुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. नागरिकांना नियमित व सुरळीत वीजपुरवठा मिळणे आवश्यक असून, दररोज सकाळी या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विद्युत महावितरणने हा प्रश्न तात्काळ मार्गी न लावल्यास नागरिकांसोबत रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले जाणार आहे, असे दत्ता गाडळकर यांनी सांगितले.



माउंट लिटेरा झी स्कूल, दौंड रोड, अरणगावच्या विद्यार्थिनी रुद्रा शिंदे आणि मानसी देशमुख वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे झालेल्या तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत पहिल्या क्रमांकाचे स्थान मिळवले.

# माउंट लिटेरा झी स्कूलच्या विद्यार्थिनींचे तायक्वांदोमध्ये सुवर्ण यश

नगर - माउंट लिटेरा झी स्कूल, दौंड रोड, अरणगावच्या विद्यार्थिनी रुद्रा शिंदे आणि मानसी देशमुख यांनी २० ऑगस्ट रोजी वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे झालेल्या तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत पहिल्या क्रमांकाचे स्थान मिळवले.

या स्पर्धेत दोन्ही विद्यार्थिनींनी आपली गुणवत्ता सिद्ध करत सुवर्ण पदकाची कमाई केली. त्यांच्या यशामध्ये शाळेच्या प्राचार्या प्रा. शैलजा लोटके, संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुनील लोटके तसेच क्रीडा प्रशिक्षक जयेश शिरसाठ यांचे मार्गदर्शन लाभले.

# आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत 'विटणकर'च्या तेजस हराळचे यश



नगर - जिल्हा पोलिस दल आयोजित राष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान २०२५ निमित्त घेण्यात आलेल्या आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत विटणकर ड्रॉईंग क्लासेसचा विद्यार्थी कु. तेजस किशोर हराळ (इ.६ वी, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल) याने प्रथम क्रमांक पटकावून १,००० रू. चे रोख पारितोषिक पटकावले.

तो नाथकृपा कन्स्ट्रक्शन सप्लायरचे किशोर व सौ. सीमा हराळ यांचा मुलगा असून त्यास अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या स्पर्धेतही प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले असून त्यास विटणकर ड्रॉईंग व हस्ताक्षर क्लासेसचे हेमंत वसंत विटणकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# गोकुळवाडीमध्ये खाली आलेल्या विजेच्या तारांमुळे नागरिकांच्या जिवीतास धोका

## तात्काळ दुरुस्ती न केल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्याचा सुनील भोसले यांचा इशारा



गोकुळवाडीमध्ये खाली आलेल्या विजेच्या तारांमुळे नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असून तात्काळ दुरुस्ती करावी या मागणीचे निवेदन तेलीखुंट येथील महावितरणच्या अधिकाऱ्यांना परिसरातील नागरिकांसह सुनील भोसले यांनी दिले.

नगर - सर्जेपुरा परिसरातील गोकुळवाडी येथे धोकादायकरीत्या खाली आलेल्या हाय टेन्शन विजेच्या तारांमुळे येथील नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असून याबाबत महावितरणने तात्काळ दुरुस्ती न केल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्याचा इशारा येथील सुनील भोसले यांनी नागरिकांसह निवेदनाद्वारे दिला आहे.

यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी तेलीखुंट येथील महावितरण कार्यालय येथे धाव घेऊन तेथील अधिकाऱ्यांना निवेदन दिले. या निवेदनात सुनील भोसले यांनी नमूद केले की, सदर हाय टेन्शन वायर इतक्या खाली आल्या आहेत की, परिसरातील घरे व दुकाने यांना त्या चिकटण्याची शक्यता आहे. नागरिकांचा संपर्क होऊन दुर्घटना होऊ शकते. त्यामुळे या प्रश्नाकडे महावितरण प्रशासनाने गंभीरतेने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. मनुष्यहानी टाळण्यासाठी तात्काळ उंच पोल बसवून वायर लाईनची दुरुस्ती करण्याचे काम हाती घ्यावे.


येत्या गणेश उत्सवापूर्वी हे काम पूर्ण न झाल्यास, स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन महावितरण कार्यालयात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा भोसले यांनी दिला आहे. या ठिकाणी दररोज मोठ्या संख्येने नागरिकांची वर्दळ असते. शाळकरी मुले, महिला व ज्येष्ठ नागरिक यांच्या जीवितास थेट धोका निर्माण झाला आहे.

# तीन वर्षांपर्यंतची शिक्षा व मोठ्या दंडाची तरतूदीने ऑनलाईन जुगारवर वचक बसणार

## केंद्र सरकारच्या निर्णयाचे पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने स्वागत; पाठपुराव्याला यश

नगर - भारतातील सर्वसामान्य जनतेला आर्थिक जाळ्यात अडकवून युवकांना देशोधडीस लावणाऱ्या जंगली रम्मी व इतर ऑनलाईन (जुगार) पैसे घेणाऱ्या खेळांवर अखेर केंद्र सरकारने कारवाई करत कायदा संसदेत सादर केला आणि लोकसभेत मंजूर केला. या निर्णयाचे पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे. केंद्र सरकारला हा निर्णय घेण्यास भाग पाडण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन सारख्या सामाजिक संस्थांची सातत्यपूर्ण लढाई असल्याची भूमिका मांडण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षांत ऑनलाईन गेम्सच्या नावाखाली लाखो कुटुंबांची बचत संपली, तरुणाई व्यसनाधीन झाली आणि समाजात गंभीर आर्थिक-सामाजिक प्रश्न उभे राहिले. मोठ-मोठे क्रिकेटपटू व चित्रपटातील नट, नट्या यांच्या जाहिरातींनी सामान्य लोकांची दिशाभूल केली. लाखो रुपये या तथाकथित मनोरंजनच्या नावाखाली लुटले गेले. या ऑनलाईन जुगारला विरोध करत पीपल्स हेल्पलाईनने सतत आवाज उठवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना दिलेल्या सततच्या निवेदनांमुळे



हा प्रश्न केंद्र सरकारच्या दृष्टीस आला. अखेरीस प्रमोशन ॲण्ड रेग्युलेशन ऑफ ऑनलाईन गेमिंग बील २०२५ लोकसभेत सादर होऊन पास झाला. यामुळे सर्व प्रकारचे पैसे घेणारे ऑनलाईन खेळ बंद होणार आहे. यात जंगली रम्मी, ई-पोकर, बेटिंग, फँटसी गेम्स इत्यादीचा समावेश आहे. अशा अवैध खेळांचे संचालन करणाऱ्यांना तीन वर्षांपर्यंतची शिक्षा व मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आल्याने यावर वचक बसणार असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हटले आहे.

या निर्णयामुळे ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे होत असलेली फसवणूक व काळ्या पैशांचा वापर थांबविण्यास मदत होणार आहे. तसेच लाखो कुटुंबांचे आर्थिक शोषण थांबेल, तरुणाईला व्यसनमुक्ती व सुरक्षित मनोरंजनाची संधी मिळेल, समाजात शांतता, स्थैर्य व सुरक्षितता वाढेल. हा कायदा सामाजिक संस्थांच्या लढ्याचे मोठे यश आहे. पण फक्त कायदा पुरेसा नाही. प्रत्येक नागरिकाने जागरूक राहून अवैध ऑनलाईन प्लॅटफॉर्मपासून दूर राहण्याचे आवाहन देखील पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आले आहे.

# गाडळकर मळा येथे घरातून चोरी; सोन्याचे दागिने व रोकड लंपास

नगर - शहरातील गाडळकर मळा येथे रात्रीच्या वेळी घराचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने घरातील कपाटातून सोन्याचे दागिने व रोकड चोरून नेल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.३० ते २० ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत संतोष रघुनाथ उदार (वय ३४, रा. गाडळकर मळा, विठाई लॉन शेजारी, काटवन खंडोबा रोड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अज्ञात चोरट्यांनी फिर्यादी यांच्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडून आत प्रवेश केला. घरात सर्वत्र उचकापाचक करत बेडरूम मधील कपाटातून सोन्याचे दागिने व रोकड असा १८ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.



तथाकथीत महाराज संग्राम भंडारे यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या जाहिर धमक्या व द्वेषपूर्ण वक्तव्यांबावत तातडीने कारवाई करणे बाबत अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.

# तथाकथीत महाराज संग्राम भंडारे यांच्यावर कारवाई करावी

## जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर - तथाकथीत महाराज संग्राम भंडारे यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या जाहिर धमक्या व द्वेषपूर्ण वक्तव्यांबावत तातडीने कारवाई करणे बाबत अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. यावेळी अहिल्यानगर जिल्हा कमिटी व सर्व तालुका अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये सौ.प्रभावती घोगरे, सरचिटणीस प्रदेश काँग्रेस राहुल उगले, प्रदेश सचिव युवक शहाजी राजेभोसले, नगर शहर अध्यक्ष दिप चव्हाण, जिल्हा सरचिटणीस श्यामराव वाघस्कर, भिंगार अध्यक्ष रिजवान शेख, नगर तालुका अरुण म्हस्के, मनोज गुंदेचा, बाळासाहेब भडारी, अनिस चुडीवाला, नासीरभाई शेख, पाथर्डी अध्यक्ष बाळासाहेब आढाव, राहुरी अध्यक्ष दादा पाटील, सुनील क्षेत्रे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

निवेदनात म्हटले आहे कि तथाकथीत महाराज संग्राम भंडारे हे सातत्याने समाजात द्वेष पसरविणारे भडकविणारे आणि राजकीय हेतूने लोकांच्या भावनांशी खेळ करणारे विधाने करत आहेत. अलिकडेच त्यांनी पक्षाचे वर्किंग कमिटी सदस्य माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे विरोधात आम्हाला नथुराम गोडसे व्हावे लागेल असे विधान केले असून त्यातुन त्यांनी थोरातांना जिवे मारण्याची उघड धमकी दिली आहे.

याशिवाय भंडारे हे वारंवार थोरात कुटुंब व त्यांच्या समर्थकां विरुध्द चिथावणीखोर विधानं करत असून, सार्वजनिक जीवनात दहशत आणि वैमनस्याचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यासाठी आमची मागणी आहे कि संग्राम भंडारे यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करन कठोर कारवाई करावी, त्यांच्या सर्व भडकाऊ आणि द्वेषपूर्ण भाषांणाची चौकशी करावी व अशा प्रकारच्या द्वेषपूर्ण कृत्यांना समर्थन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी,

अहिल्यानगर जिल्ह्यातील जनता सजग आहे आणि कुणीही यापुढे धार्मिक किंवा राजकीय कारणाने गोंधळ निर्माण करण्याचा पयत्न केला तर त्यांच्यावर प्रशासनाने कठोर कारवाई करावी. आम्ही या विषारी वक्तव्यांचा जाहिर निषेध नोंदवत आहोत आणि प्रशासनाकडुन तात्काळ कारवाईची अपेक्षा करत आहोत.

# स्वातंत्र्यविरांबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्या त्या समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

नगर - स्वातंत्र्यवीर व भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्यासह तमाम स्वातंत्र्यविरांचा अवमान करणाऱ्या समाजकंटक सागर बेग याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्यांक विभागाने केली आहे.



स्वातंत्र्यवीर व भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्यासह तमाम स्वातंत्र्यविरांचा अवमान करणाऱ्या समाजकंटक सागर बेग याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्यांक विभागाने पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली.

नालेगाव येथील भूमिपुत्र प्रतिष्ठान तर्फे १६ ऑगस्ट रोजी दहीहंडीच्या कार्यक्रमात सागर बेग याने आपल्या भाषणात भारतरत्न, स्वातंत्र्यवीर मौलाना अबुल कलाम आझाद यांच्याविषयी अत्यंत खालच्या थराचे व अशोभनीय वक्तव्य केले व तो भारताचा पहिला शिक्षण मंत्री होता असा एकेरी अपमानास्पद उल्लेख करून केवळ आझाद यांचाच नव्हे तर सर्वच स्वातंत्र्यविरांचा अपमान केला. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष अथर खान यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यामध्ये सागर बेगवर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

शिष्टमंडळाने स्पष्ट इशारा दिला की, जर अशा देशद्रोही इसमावर लवकरात लवकर कारवाई झाली नाही, तर संविधान व लोकशाहीवर विश्वास ठेवणारे सर्व नागरिक तीव्र आंदोलन छेडतील. मागील काही महिन्यांपासून नगर जिल्ह्यात दोन समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असून, समाजात तेढ पेरणाऱ्या अशा घटकांविरोधात कारवाई करणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले. या वेळी फारूक रंगरेज, समीर पठाण, आलतमश जरीवाला, संगीता खिलारी, सचिन नवगिरे, वैभव साळवे, वसीम शेख, कैफ शेख, अझहर खान, तुफेक पटेल, तौफेक शेख, शाहिद शेख, मोहसीन पठाण, सलमान बेलदार, रईस शेख, परवेज शेख, महेमूद पठाण, जाकीर शेख, रियाज कुरेशी, नईम शेख, ईक्राम तांबटकर, मोईज मेमन, खालेद तांबोली, फय्याज तांबोली, मोहसीन शेख, अनिस शेख, फिरोज शेख, अली शेख आदी उपस्थित होते.

# नगरमधील अनधिकृत गॅस रिफीलिंग सेंटरवर छापा

नगर - घरगुती वापराचा गॅस अनधिकृतपणे वाहनांमध्ये भरणाऱ्या गॅस रिफिलिंग सेंटरवर पुरवठा विभागाने पोलिसांच्या मदतीने छापा टाकत दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ५६ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई २० ऑगस्ट रोजी सकाळी ११.३८ च्या सुमारास इम्पिरियल हॉटेलच्या पाठीमागे मोकळ्या जागेत एका टीनच्या शेडमध्ये करण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की शहरातील इम्पिरियल हॉटेलच्या पाठीमागे मोकळ्या जागेत एका टीनच्या शेडच्या आडोशाला प्रथमेश राजू वाकचौरे (रा.संभाजी कॉलनी, स्टेशन रोड) व सुनिल शहादेव लांडगे (रा. स्टेशन रोड) हे दोघे शासनाचा कोणताही परवाना नसतांना बेकायदेशीर रित्या घरगुती गॅस टाक्या जवळ बाळगून लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे टाकीतुन गॅस काढून तो एलपीजी वाहनामध्ये अनधिकृत रित्या रिफिलिंग करीत आहेत. अशी माहिती पुरवठा विभागाला मिळाली होती.

त्या माहितीच्या आधारे पुरवठा विभागाच्या पथकाने कोतवाली पोलिसांच्या मदतीने त्या ठिकाणी छापा टाकला असता त्या ठिकाणी मशीन, घरगुती वापराच्या गॅस टाक्या व रिफिलिंगचे साहित्य आढळून आले. ते साहित्य जप्त करत दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या विरुद्ध शहर अन्न धान्य वितरण कार्यालयातील तेजस बाबूलाल पाटील यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम २८७, २८८, १२५, ३ (५) सह जिवनावश्यक वस्तु कायदा १९९५ चे कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक शीतल मुगडे या करीत आहेत.



'वननेस वन' अभियानांतर्गत नवीन मराठी शाळा, भिंगार येथे वृक्षारोपण करण्यात आले. (छाया- किशोर खुबचंदानी)

# निरंकारी मिशनचे 'वननेस वन' अभियान अंतर्गत नगर शाखेतर्फे वृक्षारोपण

नगर - सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजापिता रमितजी यांच्या आशीर्वादाने संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या वतीने 'वनेनस वन' परियोजनेचा ५ वा टप्पा अंतर्गत नुकतेच देशभरातील ६०० हून अधिक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

निरंकारी मंडळाच्या नगर शाखेच्या वतीने सुद्धा भिंगार येथील नवीन मराठी शाळा व रयत शिक्षण संस्थेच्या प्रांगणात तसेच सावेडी येथील सतनाम साक्षी गोशाळा या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. निरंकारी सेवादलचे क्षेत्रीय संचालक आनंद कृष्णानी यांच्या मार्गदर्शनाखाली सेवादलच्या महिला व पुरुष सदस्यांनी वृक्षारोपण केले या प्रसंगी झोनल इंचार्ज हरीष खुबचंदानी आदि उपस्थित होते.

संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी या विषयी माहिती देताना सांगितले की, 'वननेस वन' हे अभियान केवळ हिरवाई किंवा वनराई पसरविण्याचा पुढाकार नसून प्रकृतीशी नाते, मानवी उतरदायित्व आणि सह आस्तित्वाची भावना दृढ करण्यासाठी समर्पित असा एक प्रयत्न आहे. हे अभियान भावी पिढ्यांसाठी हरितमय समृद्ध वातावरण देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. ज्यायोगे येणार्या पिढ्या या सजीव वारश्याने लाभान्वित होतील. हे अभियान नि:सदेह एक स्पष्ट संदेश देत आहे,की वृक्षारोपण हे केवळ एक कार्य नसून एक साधना आहे जी संत निरंकारी मिशनच्या वतीने लागवड केलेल्या रोपांची देखभाल आणि संरक्षण करण्याचा संकल्प करीत उत्तम प्रकारे पार पाडली जात असल्याचे सुखीजाजी शेवटी म्हणाले.

# शहरात ऑटोरिक्षांची हायड्रो टेस्टिंगचे डुप्लिकेट सर्टिफिकेट देऊन परवानगी

नगर - एलपीजी व सीएनजी ऑटोरिक्षांची हायड्रो टेस्टिंगचे डुप्लिकेट सर्टिफिकेट देऊन रिक्षांना परवानगी देण्यात येत असल्याचा प्रकार समोर आला असून या बेकायदेशीर कृत्याविरोधात महाराष्ट्र वाहतूक सेनेच्या वतीने प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) विनोद सगरे यांना निवेदन देताना महाराष्ट्र वाहतूक सेनेचे जिल्हा प्रमुख सलीम खामगावकर आदी उपस्थित होते.



महाराष्ट्र वाहतूक सेनेच्या वतीने प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) विनोद सगरे यांना निवेदन देताना महाराष्ट्र वाहतूक सेनेचे जिल्हा प्रमुख सलीम खामगावकर आदी.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, रिक्षांना दिले जाणारे डुप्लिकेट हायड्रो टेस्टिंग सर्टिफिकेट धोकादायक असून अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. गॅस टाकीची तपासणी व फिटिंग करण्याचे अधिकृत अधिकार फक्त मान्यता प्राप्त सेंटरलाच आहेत. मात्र धुळे जिल्ह्यातील अनधिकृत गुजरात गॅस एजन्सीकडून कमी पैशांमध्ये पीडीएफ स्वरूपात बनावट सर्टिफिकेट रिक्षा चालकांना दिले जात आहे. ही बाब गंभीर असून पर्यावरण प्रदूषणासह प्रवाशांच्या सुरक्षेलाही धोका आहे. त्यामुळे धुळे जिल्ह्यातील अनधिकृत एजन्सीवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत व रिक्षा चालकांना वाटण्यात आलेली डुप्लिकेट सर्टिफिकेट तात्काळ रद्द करावीत. व फक्त छत्रपती संभाजीनगर येथील अधिकृत मान्यता प्राप्त दोन टेस्टिंग सेंटरमध्येच तपासणी करून परवानगी द्यावी व दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा वाहतूक सेनेतर्फे आंदोलन उभारले जाणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

आरटीओ विनोद सगरे यांनी आश्वासन दिले की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई केली जाईल. अनधिकृत डुप्लिकेट सर्टिफिकेट रद्द केले जातील व फक्त मान्यता प्राप्त छत्रपती संभाजीनगर येथील टेस्टिंग सेंटरचे सर्टिफिकेटच ग्राह्य धरले जाईल.

